महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ
हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग,
एलफिन्स्टन, मुंबई ४०००१३
दूरध्वनी क्रमांक:२४३०६७१७/२४२२७७५८/२४३६०७३८
जा.क्र.: मका/कार्य/२०१४-१५/४८१ दिनांक :- १६/०४/२०१४

## परिपत्रक

विषय :- अनुदान तत्वावर शिवण मशिन पुरविण्याबाबत.
संदर्भ :- मका/कार्य/भांडार/२०१०-११/६००दि.०८/०६/२०११

सर्व विभाग प्रमुखांना कळविण्यात येते की, मंडळाच्या व सरकारमान्य शिवण परिक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या कामगार महिला सभासदांना ९०/१० टक्के या तत्वावर शिवणयंत्र पुरविण्याची मंडळाची योजना आहे. एखाद्या केंद्रात उत्तीर्ण झालेल्या महिला सभासदांपैकी कामगार महिला / कामगार कुटुंबिय असलेली महिला प्रथम क्रमांक नसेल आणि जर दुसऱ्या किंवा तिसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाली असेल तर त्यास ती प्रथम क्रमांक आहे असे गृहित धरुन मंडळाच्या योजनेचा लाभ द्यावा.

सदर योजनेबाबतचे प्रस्ताव विभाग स्तरावर मागवून त्यास मान्यता देण्यात यावी. सदर मान्यता पत्राची एक प्रत मध्यवर्ती कार्यालयास शिवण यंत्र खरेदीच्या खर्चाच्या प्रस्तावासोबत पाठवावी. सदर योजनेचे नियम व अटी पुढील प्रमाणे राहतील.

| अ.क्र. | -: नियम व अटी :- |
|---|---|
| १. | मंडळाच्या शिवण वर्ग व सरकारमान्य शिवण वर्गातील परिक्षेत प्रथम क्रमाकांने उत्तीर्ण झालेल्या कामगार व कामगार कुटुंबातील पत्नी /मुलगी यानाच फक्त या योजनेचा लाभ घेता येईल. |
| २. | लाभार्थी हा त्या आर्थिक वर्षातील केंद्राचा सभासद असावा. |
| ३. | शिवण वर्गात प्रवेश घेतलेल्या त्या वर्षातील कामगार कल्याण निधी भरणा केल्याचा व्यवस्थापनेचा दाखला अथवा माहे जून / डिसेंबर च्या वेतनाचा दाखला इ. सादर करणाऱ्या सभासदांना कामगार व कामगार कुटुंबिय मानले जाईल. |
| ४. | ज्या केंद्रातून प्रथम क्रमांक मिळावीला आहे त्या केंद्र प्रमुखाचा दाखला व शिफारस अर्जा सोबत जोडावा लागेल. |
| ५. | गुणपत्रीका व प्रमाणपत्र अर्जा सोबत जोडावीत. |
| ६. | योजनेतील नियमाप्रमाणे बाजार पेठेतील शिवण यंत्राच्या एकूण किमतीच्या १० टक्के रक्कम अर्जदार मंडळात जमा केल्याची खाली झाल्या नंतरच संबधित अधिकाऱ्यांने प्रस्ताव मान्य करावा. |
| ७. | रेशनकार्ड / मतदान ओळखपत्र वा अन्य ओळखपत्रे या पैकीचे पुरावे म्हणून सोबत जोडणे आवश्यक आहे. |
| ८. | विहित नमुन्यात अर्ज भरलेला असावा. |

वरील नियम व अटी नुसार शिवण परिक्षेचा निकाल लागल्या नंतर संबधीतांनी वरिल सर्व बाबींची पुर्तता करुन प्राप्त झालेली अर्ज कामगार कल्याण अधिकारी यांनी दोन महिन्याचा आत विभागिय कार्यालयास पाठवावेत.

.....२

विभागिय कार्यालयाने त्याची पुर्तता करुन आपल्या स्तरावर मान्यता द्यावी आणि शिवय यंत्र खरेदीचे प्रस्ताव दरपत्रकासह मध्यवर्ती कार्यालयास सादर करावे.

विभाग प्रमुखांनी शक्यतो लाभार्थींना त्या त्या वर्षातच या योजनेचा लाभ द्यावा. विलंब लावू नये असे प्रस्ताव या कार्यालायास प्राप्त झाल्यास ना मंजूर करण्यात येतील.

कल्याण आयुक्त

प्रत,

१) सर्व विभाग प्रमुख, सर्व विभागिय कार्यालय.
२) सर्व सहाय्यक लेखा अधिकारी, सर्व विभागिय कार्यालय
३) सर्व गट प्रमुख, सर्व गट कार्यालय
४) सर्व केंद्र प्रमुख, सर्व केंद्र
५) कल्याण आयुक्तांचे स्वीय सहाय्यक, म.का.मुंबई.